# <u>प्रेसनोट</u>

<u>पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र.  423/2023          दिनांक : 07.11.2023</u>

## 1)घरफोडी :—

**1) विमानतळ :—**दिनांक 05.11.2023 चे 20.30.ते दिनांक 06.11.2023 रोजी चे 10.00 वा. दरम्यान, **कासलीवाल कॉम्पलेक्स टिळकनगर नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीताने फिर्यादीचे पी.एन.मोबाईल मल्टीसर्विसेस दुकानाचे शटरचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन दुकानातील एकुण किमती 67,500/—रुपयाचे मुद्देमाल कोणी तरी अज्ञात इसमाने चोरुन घेवुन गेंला आहे वगैरे मजकुराचे **फिर्यादी प्रितम फुलचंद भुक्तर वय 27 वर्षे रा छत्रपती चौक नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 367/2023 कलम 457, 380, भादवी, कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ /2126** राठोड, मो. क्र. **9823357541** हे करीत आहेत.

## 2)चोरी :—

**1) नांदेड ग्रामीन :—**दिनांक 04.11.2023 चे 09.30 ते 11.00 वा.दरम्यान, **अभिनय कांबळे यांचे प्लॉटमध्ये विष्णुपूरी,नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे रुमचा दरवाजा ओढून त्याचे मित्रासोबत कटींग करण्यासाठी गेला असता फिर्यादी चे बॅगमधील ॲसस व्हिओ प्रो 15 कंपनीचा काळया रंगाचा लॅपटॉप किंमत 30,000 /—रुपयाचे मुद्देमाल कोणी तरी अज्ञात इसमाने चोरुन घेवुन गेंला आहे वगैरे मजकुराचे **फिर्यादी प्रणव बाळासाहेब सजन वय 31 वर्षे रा कारजगाव ता नेवासा जि. अहमदनगर ह.मु. विष्णुपूरी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीन** गुरनं 796/2023 कलम 380, भादवी, कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ /1271 सातारे मो. क्र. 9637355836** हे करीत आहेत.

**2)नायगाव :—** दिनांक 06.11.2023 रोजी चे 13.00 वा.चे सुामरास, **बसस्थानक नायगाव येथे,** यातील फिर्यादी बसची वाट बघत थांबला असता कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे 65,000 रुपये चोरुन नेले वगैरे **फिर्यादी तानाजी नारायण सोमनकर, वय 65 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कोलंबी ता.नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरन 174/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2006 मस्तापुरे,** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :—

**1)वजिराबाद :—** दिनांक 05.11.2023 रोजी चे 12.00 वा. चे सुमारास, आरपीएफ स्टेशन च्या बाजुला क्वॉर्टर जवळ नांदेड, यातील फिर्यादीची मो.सा.क्र एम.एच. 26 बि.एम. 9678 सिबी शाईन काळया रंगाची ज्यावर लाल रंगांचे पट्टे असलेली किंमती 35,000/—रूपयाची हा त्याच्या मित्राच्या घराच्या बाजुला क्वॉर्टर जवळ गाडी उभा करुन परत थोडयावेळाने घरी जाण्यासाठी गाडी लावलेल्या ठिकाणी येवुन पाहिले असता ती मिळुन आली नाही कोणीतरी आज्ञात चोरटयायने चोरुन नेली वगैरे फिर्यादी **वैभव संगमनाथ सातारे, वय 27 वर्षे, व्यवसाय शिक्षक रा. स्वामी विवेकानंद नगर तरोडा नाका जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 508/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/152 परदेशी, मो. क्रं. 9923106209** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ

**1)भाग्यनगर :—** दिनांक 14.01.2022 17.00 वा पावेतो चे, **मौ.दत्तनगर ता. किनवट. जि. नांदेड, येथे** यातील नमुद 05 आरोपीताने संगनतम करुन फिर्यादीस आरोपीताने मुलाच्या दवाखाण्याचे बांधकामासाठी 20 लाख रुपये घेवुन ये असे म्हणुन फिर्यादिस शारिरीक व मानसिक छळ करुन शिविगाळ करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली वैगेरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 430/2023 कलम 498(अ), 323, 504, 506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोहेकॉ/1303 हुंडे, मो.क्रं. 7798006100** हे करीत आहेत.

## 5)अपघात :—

**1)कंधार :—** दिनांक 02.11.2023 रोजी चे 10.00 ते 10.30 वा. चे सुमारास, **मानसपुरी येथील महादेव मंदिराचे समोरील रोडवर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **फिर्यादी व त्याचा भाउ व त्याचा मित्र देवदर्शन करुन परत गावाकडे त्यांचे इंडीगो कार क्रमांक एम.एच.29 आर 7258 जात असतांना,** यास यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील कार क्रमांक एमएच—12/पीटी—3002 च्या चालकाने त्याचे ताब्यातील कार हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील फिर्यादी त्याचा भाउ व भावाचा मित्र यास गंभिर जखमी करुन वाहानाचे नुकसान केले वगैरे **फिर्यादी जसप्रितसिंघ प्रदीपसिंध ननरे, वय 25 वर्षे, रा. पृथ्वीराजनगर यवतमाळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं. 353/2023 कलम 279, 337,338,427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/गणाचार्य, मो.क्र. 9823391570** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**1)कंधार :–** दिनांक 06.11.2023 रोजी चे 16.05 वा. चे सुमारास, **गिट्टी केशर जवळ मंगनाळी ता कंधार येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 18430/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/986 रविंद्र कचरे ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 354/2023 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/इंद्राळे मो.क्रं. 9975754256** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड